# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल,जि.रायगड-४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Website: http://jdhepanvel.org

दूरध्वी व फॅक्स ंबर (०२२-२७४५३८२०)


क्र.विसस/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१८/789 दि. 11/04/18

प्रति,

प्राचार्य

सर्व अधिनस्त अनुदानित व विना अनुदानित कला, वाणिज्य,

विज्ञान, विधी व अध्यापक महाविदयालये,

जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग

**विषयः आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी पात्र विद्यार्थ्यांच्या हिश्श्याची शिक्षण शुल्काची रक्कम शिक्षण संस्थांनी न घेण्याबाबत तसेच संबंधित पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांस डी. बी. टी. द्वारे अनुज्ञेय शिष्यवृत्तीची रक्कम ही त्यांनी त्यांच्या महाविद्यालयास शुल्कापोटी तात्काळ अदा करणेबाबत...**

संदर्भः मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/ शिष्य-२०१७/ ईबीसी/ ४४३२, दि. ०९.०४.२०१८

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७.१०.२०१७ नुसार राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी लाभाची व्याप्ती वाढविण्यात आलेली आहे. तसेच काही नवीन अभ्यासक्रमांचाही समावेश करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्यात येतो.

सदर योजनेतर्गत विद्यार्थ्यांस अनुज्ञेय असणाऱ्या शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीची रक्कम ही संबंधित विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी आगाऊ स्वरुपात घेऊ नये व विद्यार्थ्यांची पिळवणूक होणार नाही याची योग्य ती खबरदारी संबंधित महाविद्यालयांनी घ्यावी. **तसेच संबंधित पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांस डी.बी.टी. द्वारे अनुज्ञेय शिष्यवृत्तीची रक्कम प्राप्त होताच विद्यार्थ्यांनी त्यांच्या महाविद्यालयास देय असलेली शिक्षण शुल्काची रक्कम तात्काळ अदा करावी व याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित विद्यार्थ्याची असेल.** याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदरची बाब ही आपल्या महाविद्यालयातील संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देणेत यावी.

**सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, सदर शिष्यवृत्तीची रक्कम ही लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये लवकरात लवकर जमा करण्यात येणार आहे. तरी विद्यार्थ्यांच्या बँक खाते क्रमांकात काही त्रुटी आढळल्यास आपणास कळविण्यात येईल व त्या त्रुटींची तात्काळ पूर्तता करून दयावी. अन्यथा सदर विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये रक्कम जमा न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील.**

RBhosle

विभागीय सहसंचालक

उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

प्रत :

मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ यांना माहितीस्तव सादर